# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा महोत्सव

# नियमावली

प्रा. (डॉ.) आर. व्ही. गुरव
संचालक
विद्यार्थी विकास

# अनुक्रमणिका


1 युवा महोत्सव संयोजन उद्देश ........................................................................ 03

2 युवा महोत्सव स्पर्धेसाठी नियम ........................................................................ 04

3 युवा महोत्सव स्पर्धकांना सूचना ........................................................................ 04

4 जिल्हास्तरीय युवा महोत्सव नियमावली ........................................................... 07

5 जिल्हास्तरीय युवा महोत्सव स्पर्धा प्रकार ........................................................ 07

6 मध्यवर्ती युवा महोत्सव नियमावली ................................................................ 13

7 मध्यवर्ती युवा महोत्सव स्पर्धा प्रकार ............................................................. 13

8 मध्यवर्ती युवा महोत्सवात आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धांची संक्षिप्त माहिती .. 20

9 युवा महोत्सव विभागानुसार कला प्रकार यादी ........................................................ 21

10 सादरीकरणाबाबत महत्वाच्या सुचना ................................................................. 22

11 सर्वसाधारण विजेतेपद **(GENERAL CHAMPIONSHIP)** नियमावली ..................... 23

12 परिक्षकांना सुचना ............................................................................................ 24

13 स्पर्धकांना सुचना ............................................................................................. 24

14 संघप्रमुखांना सुचना ......................................................................................... 25

15 सादरीकरणाबाबत दयावयाच्या हमीपत्राचा नमुना ............................................... 26

16 वैयक्तिक कलाप्रकार सहभाग नोंदणी अर्जाचा नमुना ........................................... 27

17 सांघिक कलाप्रकार सहभाग नोंदणी अर्जाचा नमुना .............................................. 28

# युवा महोत्सव संयोजन उद्देश

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने आणि त्यांच्यात संघ भावना येवून एकमेकांच्या गुण वैशिष्टयाबद्दल आदर निर्माण व्हावा तसेच सांस्कृतिक कलाप्रकारामध्ये सर्वोकृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विद्यापीठ संघामध्ये समावेश करून त्यांना राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळावी यादृष्टीने युवा महोत्सवामध्ये विविध स्पर्धा आयोजित करण्यात येतात.

शिवाजी विद्यापीठाचा युवा महोत्सव दोन स्तरावर आयोजित करण्यात येतो. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्हयातील महाविद्यालयांकडून संयोजनाकरिता प्रस्ताव मागवणेत येतात व जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन विद्यापीठातर्फे सप्टेंबर/ऑक्टोंबर महिन्यामध्ये विद्यार्थी विकास विभागामार्फत यजमान महाविद्यालयामध्ये करण्यात येते. जिल्हास्तरीय युवा महोत्सवामधून गुणानुक्रमे निवडलेले उत्कृष्ट तीन संघ/तीन स्पर्धक आणि प्रश्नमंजुषा स्पर्धेमधील गुणानुक्रमे पहिले एकूण सहा संघ मध्यवर्ती युवा महोत्सवाला निवडण्यात येतात. तसेच काही कलाप्रकारांची थेट मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये स्पर्धा घेतली जाते.

युवा महोत्सवाच्या सुनियोजित आयोजनाकरिता (जिल्हास्तरीय व मध्यवर्ती) तसेच राज्यस्तरीय, विभागीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय युवा महोत्सव/संबंधित स्पर्धा (कव्वाली) यासाठी संघनिवड, प्रशिक्षण इ. च्या मार्गदर्शनासाठी व समन्वयासाठी मा. कुलगुरूंचे अध्यक्षतेखाली व नामनिर्देशनानुसार प्रतिवर्षी खालीलप्रमाणे युवा महोत्सव समितीचे गठण करण्यात येईल.

मा. कुलगुरू (अध्यक्ष)

मा. प्र–कुलगुरू

मा. कुलसचिव

मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ

मा. वित्त व लेखाधिकारी

व्यवस्थापन परिषद सदस्य (2)

प्राचार्य/प्राध्यापक (4)

संगीत व नाटयशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक (1)

युवा महोत्सव जिल्हा समन्वयक (3)

मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना

संचालक, विद्यार्थी विकास (सचिव)

# युवा महोत्सव स्पर्धेसाठी नियम

1. महाविद्यालयांनी आपल्या स्पर्धकांची नावे एकाच प्रवेश अर्जात लिहून प्रवेशिका दोन प्रतीमध्ये संचालक, विद्यार्थी विकास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना योग्य त्या शुल्काच्या भरणा पावतीसह पाठवावयाच्या आहेत. प्रवेश शुल्क भरल्याशिवाय प्रवेशिका स्विकारल्या जाणार नाहीत. (प्रवेश अर्जाचा नमूना सोबत जोडला आहे).
2. प्रत्येक वैयक्तिक स्पर्धेसाठी रु. 100/— व प्रत्येक सांघिक स्पर्धेसाठी रु. 200/— इतके प्रवेश शुल्क भरावयाचे आहे. तरी स्पर्धेत सहभागी होणा—या प्रत्येक महाविद्यालयाने वैयक्तिक/सांघिक स्पर्धेतील सहभागी कलाप्रकारांच्या संख्येनुसार होणारी प्रवेश शुल्काची एकूण रक्कम मा. वित्त व लेखाधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नांवे डिमांड ड्राफ्टने जमा करावी.
3. सर्व स्पर्धांसाठीच्या प्रवेशिका या पुस्तिकेत दिलेल्या विहित नमून्यात पाठवावयाच्या आहेत.
4. महाविद्यालय/विद्यापीठ अधिविभाग यांनी एका वैयक्तिक स्पर्धेसाठी एकाच स्पर्धक विद्याथ्याचे किंवा विद्यार्थीनींचे नाव पाठवावयाचे आहे.
5. प्रथम कलाकारांची नांवे, त्यानंतर विद्यार्थी साथीदारांची नांवे व त्यानंतर व्यावसायिक साथीदारांची नांवे क्रमाने लिहावीत
6. कलाकार व विद्यार्थी साथीदार यांचे शिकत असलेले वर्ग व जन्मतारीख प्रवेशिकेत नोंदविणे आवश्यक आहे.
7. संघव्यवस्थापक व प्राचार्य यांचे सादरीकरणाबाबतचे संयुक्त हमीपत्र आवश्यक आहे (सोबत नमूना जोडला आहे).
8. एकांकिका, मुकनाटय, लघुनाटिका यापैकी एक किंवा अनेक स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाविद्यालयांनी जास्तीत जास्त एकूण तीन साथीदार आणावयाचे आहेत.
9. समूहगीत, सुगमगायन व लोककला/लोकनृत्य स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाविद्यालयांनी जास्तीत जास्त एकूण पाच साथीदार आणावयाचे आहेत.
10. फक्त समूहगीत स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाविद्यालयांनी जास्तीत जास्त एकूण तीन साथीदार आणावयाचे आहेत.

# युवा महोत्सव स्पर्धकांना सुचना

1. स्पर्धक विद्यार्थी—विद्यार्थीनीने या मार्गदर्शक पुस्तिकेमध्ये असलेल्या नमून्यामध्ये ओळखपत्र (आयडेंटीटी सर्टीफीकेट) सतत जवळ ठेवणे आवश्यक आहे.
2. सर्व विद्यार्थी—विद्यार्थीनींनी स्पर्धेच्या ठिकाणी सर्व कार्यक्रमांना सादरीकरणासाठी वेळेवर उपस्थित राहिलेच पाहिजे.
3. स्पर्धा सुरू होण्यापूर्वी स्पर्धेच्या ठिकाणी स्पर्धकांनी दहा मिनिटे आगोदर उपस्थित रहावे.
4. महाविद्यालयाची कोड कमांक आणि स्पर्धाप्रकारानुसार सादरीकरणाचे कम विद्यापीठ युवा महोत्सव समितीकडून स्पर्धेपूर्वी दिले जातील. स्पर्धकांना लॉटमध्ये जाहीर झालेल्या क्रमांकानेच भाग घेता येईल. ऐनवेळी यामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही.
5. लघुनाटिका आणि एकांकिकेच्या संहिता/कथानक तसेच लोकनृत्याचा सारांश **चार प्रती मुद्रित स्वरूपामध्ये** स्पर्धा सुरु होणेपूर्वी संयोजकांच्याकडे देणे आवश्यक आहे.
6. कोणत्याही प्रकारच्या नियमबाहय वा बाधक गैर/बेशिस्त वर्तनाबद्दल विद्यार्थ्यांस शासन केले जाईल व त्याची माहिती संबधित प्राचार्यांना व विद्यापीठास कळविली जाईल.
7. कोणत्याही वस्तुची/वाद्यांची अगर साहित्याची मोडतोड केल्यास त्याची संबधित व्यक्तीकडून भरपाई करून घेतली जाईल.
8. संयोजकांच्या पूर्व परवानगीशिवाय स्पर्धक विद्यार्थी विद्यार्थीनींना युवा महोत्सव परिसर सोडता येणार नाही.

9. विद्यार्थी/विद्यार्थीनींनी कोणत्याही प्रकारच्या तक्रारी, संबधित संघ व्यवस्थापक प्राध्यापकामार्फत युवा महोत्सव समितीकडे लेखी सादर कराव्यात. अन्यथा तक्रारींची दखल घेतली जाणार नाही.
10. परीक्षक मंडळाचे निर्णय सर्वांना अंतिम व बंधनकारक राहतील.
11. स्पर्धकांना दिलेले अनुक्रमांकाचे बॅचेस त्यांनी स्पर्धेच्या वेळी लावलेच पाहिजेत.
12. समूहगीत, लोककला व लोकनृत्य स्पर्धासाठी टेपरेकॉर्डर संगीत वापरता येणार नाही.
13. सांघिक स्पर्धेच्यावेळी आपल्या संघाची ठराविक नमुन्यातील माहिती तीन प्रतीत स्पर्धेपूर्वी परीक्षकांचेकडे/स्पर्धास्थळी असणाऱ्या संयोजकाकडे द्यावी. ही माहिती यजमान महाविद्यालयांनी नंतर संचालक, विद्यार्थी विकास यांचेकडे पाठवून द्यावयाची आहे.
14. कोणत्याही वादग्रस्त विषयाबाबत विद्यार्थी/संघव्यवस्थापक/महाविद्यालयास प्रसार माध्यमाकडे जाता येणार नाही. ते बेशिस्तीचे वर्तन समजले जाईल व अशा महाविद्यालयांवर विद्यापीठामार्फत योग्य ती कारवाई केली जाईल.
15. जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये सहभागी संघातील कलाकार आणि साथीदार यांची एकूण संख्या 50 पेक्षा जास्त असणार नाही.
16. **संघ व्यवस्थापक व प्राचार्य यांच्या हमीपत्राप्रमाणे जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये सहभागी कलाकाराने/संघाने स्पर्धेच्या ठिकाणी सादरीकरणासाठी वेळेत उपस्थित रहावे. सादरीकरणासाठी स्पर्धेच्या ठिकाणी कलाकाराचा/संघाचा (महाविद्यालयाचा) कोड नंबर तीन वेळा पुकारला जाईल. तीन वेळा महाविद्यालयाचा कोड पुकारुनही संबंधित कलाकार/संघ वेळेत सादरीकरणासाठी उपस्थित न राहिल्यास असा कलाकार/संघ स्पर्धेतून बाद ठरविण्यात येईल. याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.**
17. **साहित्य** – प्रत्येक स्पर्धेत भाग घेण्यासाठी लागणारी सर्व वाद्ये व इतर साहित्य स्पर्धकांनी आपल्या बरोबर आणावेत. संयोजकांकडून कोणतेही साहित्य अथवा वाद्ये पुरविली जाणार नाहीत.
18. **कपडे/बिछाने** – स्पर्धकांनी त्यांना आवश्यक असणारे कपडे व बिछाने आपल्या बरोबर आणावेत. संयोजकाकडून बिछाने पुरविले जाणार नाहीत.
19. **प्रवास खर्च** – कलाकार, साथीदार व संघव्यवस्थापक यांचा प्रवास खर्च ज्या त्या महाविद्यालयाने करावयाचा आहे.
20. **पात्रता** – प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या दि. 1 जूलै, रोजी ज्याचे वय 25 वर्षाहून कमी असेल अशा शिवाजी विद्यापीठ क्षेत्रातील सर्व संलग्न महाविद्यालयातील/संस्थेतील व शिवाजी विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर अधिविभागामध्ये **पूर्णवेळ आणि नियमित** शिकत असणाऱ्या व कमीत कमी एक वर्ष पूर्णवेळ मुदतीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना युवक महोत्सव स्पर्धामध्ये भाग घेता येईल. प्रोव्हिजनल ॲडमिशन मान्य केले जाणार नाही (11 वी 12 च्या विद्यार्थ्यांना व्यावसायीक साथीदार म्हणून भाग घेता येईल, मात्र स्पर्धक म्हणून भाग घेता येणार नाही). तसेच सहभागी होणाऱ्या विद्यार्थी अगर विद्यार्थीनीने विद्यापीठात अगर महाविद्यालयात संस्थेत पदवी अथवा पदवीकेसाठी प्रवेश घेऊन 7 वर्षापेक्षा अधिक काळ उलटून गेला असल्यास अशा विद्यार्थी अगर विद्यार्थीनींना व्यावसायीक साथीदार म्हणून भाग घेता येईल, मात्र स्पर्धेत भाग घेता येणार नाही. पुर्णवेळ नोकरदार या विद्यार्थी/विद्यार्थीनींना स्पर्धेक म्हणून भाग घेता येणार नाही.
21. **ओळख पत्र** – मध्यवर्ती युवा महोत्सवात भाग घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीजवळ (संघ व्यवस्थापक, स्पर्धक व साथीदार यांचे जवळ) संबधीत महाविद्यालयचे/संस्थेचे/डिपार्टमेंटचे फोटोसह विहीत नमुन्यातील प्राचार्याच्या/विभागप्रमुखांच्या सहीचे **ओळखपत्र व चालू वर्षाची फी भरणा पावती** असल्याशिवाय स्पर्धकास कोणत्याही स्पर्धेत भाग घेता येणार नाही. तरी मध्यवर्ती युवा महोत्सवात सहभागी होणाऱ्या महाविद्यालयाचे प्राचार्यांनी व पदव्युत्तर अधिविभागप्रमुखांनी आपल्या संघातील विद्यार्थी विद्यार्थीनींना सोबतच्या नमुन्यातील ओळखपत्रे द्यावीत.
22. **शिस्त** – स्पर्धेच्या ठिकाणी सर्व स्पर्धकांनी शिस्तीचे काटेकोर पालन करावयाचे आहे. परीक्षकांनी जाहीर केलेले निर्णय सर्वांना बंधनकारक व अंतिम असतील. कोणत्याही वादग्रस्त विषयाबाबत

कोणत्याही महाविद्यालयास प्रसार माध्यमाकडे जाता येणार नाही. ते बेशिस्तीचे वर्तन समजले जाईल. **दिलेल्या वेळेत सादरीकरण न केल्यास स्पर्धक/संघ स्पर्धेतून बाद केला जाईल व याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही. बेशिस्त वर्तन करणाऱ्यावर विद्यापीठाकडून शिस्तभंगाची कार्यवाही केली जाईल.**

23. **संघ व्यवस्थापक–** प्रत्येक महाविद्यालयातील 15 विद्यार्थी संख्येपर्यंतच्या संघाबरोबर एक प्राध्यापक किंवा एक प्राध्यापिका संघ व्यवस्थापक असणे आवश्यक आहे. त्यापुढील संख्येच्या विद्यार्थी संघाबरोबर एक प्राध्यापक व एक प्राध्यापिका असे दोन संघ व्यवस्थापक पाठवून द्यावेत. **संघ व्यवस्थापक प्राध्यापकांनी आपल्या महाविद्यालयाचे विद्यार्थी/विद्यार्थीनी बरोबर राहणेचे असून त्यांनी आपल्या संघातील स्पर्धकांना स्पर्धेच्या ठिकाणी, नियोजित वेळेपूर्वी पोहचवण्याची व्यवस्था करावयाची आहे.** संघातील विद्यार्थी–विद्यार्थीनींनी युवा महोत्सव स्थळी नियमाचे पालन काटेकोरपणे करावयाचे असून त्याची अंमलजबजावणी संघ प्रमुख प्राध्यापक/प्राध्यापिका यांनी करावयाची आहे. तसेच त्यांनी आपला महाविद्यालयीन संघ व युवा महोत्सव संयोजन समिती यांच्यातील संपर्क अधिकारी म्हणून काम पहावयाचे आहे. मध्यवर्ती युवा महोत्सवात वैयक्तिक व सांघिक स्पर्धांच्या स्पर्धकांचा समावेश असल्यामुळे सांघिक व वैयक्तिक स्पर्धेसाठी स्वतंत्र संघ व्यवस्थापक पाठवू नयेत. ते मान्य केले जाणार नाहीत.
24. **निवास व भोजन–** मध्यवर्ती युवा महोत्सवात भाग घेणाऱ्या प्रत्येक महाविद्यालयीन संघातील संघ व्यवस्थापक व विद्यार्थी स्पर्धक यांची निवास व भोजनाची व्यवस्था युवा महोत्सवस्थळी विनामुल्य करण्यात येईल. मात्र प्रत्येकाने आपला बिछाना बरोबर आणणे आवश्यक आहे.
25. **साथीदाराच्या निवास व भोजनाची व्यवस्था–** विद्यार्थी साथीदारांची निवास व भोजनाची व्यवस्था विनामुल्य करण्यात येईल. मात्र व्यावसायिक साथिदारांना ही सुविधा मिळणार नाही.
26. **प्रवास खर्च–** संघ व्यवस्थापक, स्पर्धक व विद्यार्थी साथीदार यांच्या प्रवासावर होणारा खर्च ज्या–त्या महाविद्यालयांनी करावयाचा आहे.
27. **तज्ञ परिक्षक नियुक्ती–** जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवातील विविध स्पर्धांच्या परिक्षणासाठी प्रत्येक स्पर्धेसाठी कमीत कमी दोन व जास्तीत जास्त तीन तज्ञ परिक्षकांची नियुक्ती विद्यापीठ युवा महोत्सव समितीकडून करणेत येईल यामध्ये कोणासही हस्तक्षेप करता येणार नाही. पुर्वनियुक्त परिक्षक एनवेळी स्पर्धाठिकाणी उपस्थित न राहिल्यास सर्व स्पर्धांसाठी युवा महोत्सव समिती नविन परिक्षकाची नेमणूक करेल. आवश्यकता भासल्यास परिक्षकांची संख्या कमी/जास्त करण्याचा अधिकार युवा महोत्सव समितीस असेल
28. व्यावसायिक साथीदार तंबाखू खाऊन आजूबाजूला थुंकतात असे निदर्शनास आले आहे. स्पर्धक, संघव्यवस्थापक तसेच व्यावसायिक साथीदारांनी धुम्रपान, मद्यपान, तंबाखूजन्य पदार्थ खाणे निषिध्द आहे. त्यांच्याकडून गैरवर्तवणूक होणार नाही याची खबदारी स्पर्धक महाविद्यालयांनी घ्यावी. असे आढळयास संघ स्पर्धेतून बाद केला जाईल.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सव नियमावली

1. अ) जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील प्रत्येक सांघिक स्पर्धेसाठी किमान तीन प्रवेश अर्ज येणेआवश्यक आहे त्यापेक्षा कमी प्रवेशिका असल्यास ती स्पर्धा घेतली जाणार नाही. वैयक्तिकस्पर्धेत किमान तीन प्रवेशिका येणे आवश्यक आहे. यापेक्षा कमी आल्यास या विद्यार्थ्यांना मध्यवर्तीयुवा महोत्सवात थेट प्रवेश दिला जाईल.

   ब) महाविद्यालयास प्रत्येक सांघिक स्पर्धेसाठी फक्त एकच संघ पाठविता येईल. वैयक्तिक स्पर्धेसाठी एका महाविद्यालयास प्रत्येक भाषेत एकापेक्षा अधिक विद्यार्थ्यांना पाठविता येणार नाही. वादविवाद स्पर्धेसाठी वेगळे विद्यार्थी पाठविण्याची तरतूद आहे.
2. युवा महोत्सवातील प्रत्येक स्पर्धेसाठी वेगळया प्रवेशिका सोबत दिलेल्या विहीत नमुन्यात संयोजक समितीने निर्धारीत केलेल्या मुदतीमध्ये **संचालक, विद्यार्थी विकास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** यांना पाठवाव्यात. या निर्धारीत वेळेनंतर आलेल्या प्रवेशिकांचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.
3. जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचा निकाल सर्व स्पर्धा संपल्यानंतर सर्व महाविद्यालयांना ई–मेल द्वारे कळविण्यात येईल. निकाल स्पर्धेच्या ठिकाणी जाहिर केला जाणार नाही.
4. **महत्वाची सुचना –** एकांकिका, मुकनाटय व समूहगीत सादर करताना भारतीय संस्कृतीचे त्यातून दर्शन घडावे व त्यामधून राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम, त्याग, सत्य, कला इत्यादी मुल्यांवर भर दिलेला असावा.

## जिल्हास्तरीय युवा महोत्सव स्पर्धा प्रकार

अ. सांघिक स्पर्धा

1. लोकनृत्य (FOLK/TRIBAL DANCE) किंवा लोककला (FOLK ART)
2. एकांकिका (ONE ACT PLAY)
3. लघुनाटीका(प्रहसिका SKIT)
4. मुकनाटय (माईम)
5. पथनाटय (STREET PLAY)
6. भारतीय समूहगीत (INDIAN GROUP SONG)
7. लोकसंगीत वाद्यवृंद (FOLK ORCHESTRA)
8. वादविवाद (DEBATE)
9. प्रश्नमंजुषा (QUIZ)

ब. वैयक्तिक स्पर्धा

1. नकला (MIMICRY)
2. सुगमगायनः (भावगीत / भक्तीगीत / गझल / अभंग इ.) (LIGHT VOCAL)
3. वक्तृत्व (मराठी) (ELOCUTION)
4. वक्तृत्व (हिंदी)
5. वक्तृत्व (इंग्रजी)

# जिल्हास्तरीय युवा महोत्सव विविध स्पर्धा प्रकारांसाठी नियमावली

1. लोकनृत्यः
   1. एका महाविद्यालयाने एकच संघ पाठवावयाचा आहे.
   2. पारंपारिक भारतीय समुह लोकनृत्य असावे.
   3. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या कलाकारांची संख्या जास्तीत जास्त 10 व कमीत कमी 6 असावी.
   4. या स्पर्धेत जास्तीत जास्त पाच विद्यार्थी/व्यावसायिक साथीदारांचा वापर करता येईल.
   5. लोकनृत्याच्या प्राथमिक तयारीसाठी प्रत्येक संघाला 10 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
   6. लोकनृत्य किमान 8 मिनिटांचे व कमाल 10 मिनिटांचे असावे. जास्तीत जास्त 30 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
   7. लोकनृत्यासाठी वेषभूषा, रंगभूषा व पार्श्वसंगीत अनुषंगीक आणि सुसंगत असणे आवश्यक आहे.
   8. सिनेसंगीतावर आधारीत लोकनृत्यास परवानगी नाही.
   9. अश्लील व बिभत्स लोकनृत्य सादर करणाऱ्या संघावर कडक कारवाई करण्यात येईल.
   10. लोकनृत्यासाठी टेप–रेकॉर्डर/पूर्व ध्वनीमुद्रीत(टेप/कॅसेट)अशा संगीताचा वापर करता येणार नाही.
   11. संघ मुलांचा, मुलींचा अथवा मुलामुलींचा असू शकेल.
   12. मुल्यमापन तालबध्दता, रचना, मुद्रा, रंगभूषा, वेषभुषा व सादरीकरण इ. बाबींवर अवलंबून राहील.
   13. नृत्याचे सादरीकरण झाल्यानंतर ताबडतोब सहभागी संघानेच रंगमंच रिकामा व स्वच्छ करून देणेचा आहे.
   14. लोकनृत्य प्रकारामध्ये कोळी नृत्य, धनगरी नृत्य, शेतकरी नृत्य, लेझीम नृत्य, नृत्य आदिवासी नृत्य, भांगडा, गरबा नृत्य, रास/दांडिया नृत्य, घुमर, लमाणी नृत्य, बंजारा, गिड्ढा/गिद्दा, थाळी नृत्य, बांबू नृत्य, ढोल ताशा/थरारा, दिंडी नृत्य, गजनृत्य इ. कलाप्रकारांचा समावेश असेल.
2. लोककलाः
   1. एका महाविद्यालयाने एकच संघ पाठवावयाचा आहे.
   2. भारतीय समुह लोककला असावी.
   3. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या कलाकारांची संख्या जास्तीत जास्त 10 व कमीत कमी 3 असावी.
   4. या स्पर्धेत जास्तीत जास्त पाच विद्यार्थी /व्यावसायिक साथीदारांचा वापर करता येईल.
   5. लोककलेच्या प्राथमिक तयारीसाठी प्रत्येक संघाला 10 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
   6. लोककला किमान 8 मिनिटांची व कमाल 10 मिनिटांची असावी. जास्तीत जास्त 30 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
   7. लोककलेसाठी वेषभूषा, रंगभूषा, व पार्श्वसंगीत अनुषंगीक आणि सुसंगत असणे आवश्यक आहे.
   8. सिनेसंगीतावर आधारीत लोककलेस परवानगी नाही.
   9. अश्लील व बिभत्स लोककला सादर करणाऱ्या संघावर कडक कारवाई करण्यात येईल.
   10. लोककलेसाठी टेप–रेकॉर्डर/पूर्व ध्वनीमुद्रीत (टेप/कॅसेट) अशा संगीताचा वापर करता येणार नाही.
   11. संघ मुलांचा, मुलींचा अथवा मुलामुलींचा असू शकेल.
   12. मुल्यमापन तालबध्दता, रचना, मुद्रा, रंगभूषा, वेषभुषा इ. बाबीवर अवलंबून राहील.
   13. लोककलेचे सादरीकरण झाल्यानंतर ताबडतोब सहभागी संघानेच रंगमंच रिकामा व स्वच्छ करून देणेचा आहे.
   14. लोककला प्रकारामध्ये वाघ्या मुरळी, लावणी, पोवाडा, भारुड, किर्तन, गोंधळ, वासुदेव, पिंगळा, भजन, जोगवा, आराधी, मंगळागौर, हादगी (भोंडला), धनगरी ओव्या इ. कलाप्रकारांचा समावेश असेल.

**टिप : एका महाविद्यालयास लोकनृत्य किंवा लोककला या दोन कलाप्रकारापैकी एकाच स्पर्धा प्रकारात सहभाग घेता येईल. यासाठी प्रवेश पत्रिकेत कलाप्रकार नोंदवावा.**

3. **एकांकिका :**

1. एका महाविद्यालयाने फक्त एकच संघ पाठवावयाचा आहे.
1. एकांकिका मराठी अथवा हिंदी भाषेत असावी. नाटकाचा अंक किंवा प्रवेश सादर करता येणार नाही. या स्पर्धेकरिता प्रत्येक महाविद्यालयास एक प्रवेशिका पाठविता येईल.
2. सादरीकरणासाठी किमान वेळ 25 मिनिटे व कमाल वेळ 30 मिनिटे देण्यात येईल. प्राथमिक तयारीसाठी 10 मिनिटापेक्षा अधिक वेळ मिळणार नाही. (एकूण 40 मिनिटे).
3. सादरीकरणासाठी जास्तीत जास्त 30 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. यापेक्षा अधिकवेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
4. सर्वसाधारण प्रकाश योजना व सामान्यतः लागणारे फर्निचर यासारखे साहित्य संयोजक महाविद्यालयातर्फे पुरविण्यात येईल. परंतू काही विशिष्ट साहित्य लागल्यास त्याची व्यवस्था संघानेच करावी.
5. एकांकिकेसाठी संबधित लेखकांची लेखी परवानगी घेणे आवश्यक असून सदर परवानगी पत्र सादरीकरण करण्यापूर्वी परिक्षकांकडे देणे आवश्यक आहे.
6. एकांकिकेतील पात्रांची संख्या 9 पेक्षा जास्त असता कामा नये.
7. साथीदारांची संख्या 3 पेक्षा अधिक असता कामा नये.
8. स्पर्धेचे मुल्यमापन विषयाची निवड, अभिनय, रंगभूषा, वेषभूषा आणि प्रेक्षकांवर एकंदर परिणाम इ. बाबींवर अवलंबून राहील.
9. उत्कृष्ट पुरुष/स्त्री अभिनयासाठी निवडलेला कलाकार पहिल्या तीन विजेत्या संघामधील नसल्यास अशा संघास अधिकचे 3 गुण दिले जातील मात्र उत्कृष्ट पुरुष/स्त्री अभिनयासाठी निवडलेला/निवडलेली कलाकार ही विजेत्या संघातील असेल तर त्या संघास 3 गुण मिळणार नाहीत.

4. **लघु नाटीका :**

1. एका महाविद्यालयाने फक्त एकच संघ पाठवावयाचा आहे.
2. लघु नाटीका मराठी अथवा हिंदी भाषेत असावी.
3. स्पर्धक विद्यार्थ्यांची संख्या कमाल सहा आणि किमान तीन राहील.
4. साथीदारांची संख्या जास्तीत जास्त 3 असेल.
5. सादरीकरणासाठी किमान 8 मिनिटे व कमाल 10 मिनिटे वेळ दिला जाईल.
6. जास्तीत जास्त 30 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
7. नाटीकेमध्ये राष्ट्रीय व्यक्तींवर वा राष्ट्रीय तत्वांवर टीका तसेच चरित्र/चारित्र्य हनन आणि शारिरीक व्यंगावर टिका अशा बाबींचा समावेश असता कामा नये.
8. स्पर्धकांना रंगभूषा, वेषभूषा, प्रकाश योजना व पार्श्वसंगीत याचा वापर करता येईल.
9. सादरीकरणासाठी विषय ज्या त्या महाविद्यालयाने निवडावयाचा आहे. राष्ट्रीय एकात्मता, अंधश्रध्दा निर्मुलन व सामाजिक समस्या अशा विषयांना प्राधान्य द्यावे. लघुनाटीका ही विनोदी, विडंबनात्मक, उपरोधात्मक असावी. मात्र ती टीकात्मक असू नये.
10. स्पर्धेचे मुल्यमापन विषयाची निवड, अभिनय, संरचना, प्रेक्षकावरील परिणाम इ. बाबींवर अवलंबून राहील.

5. **मुकनाटय :**

मुकनाटय म्हणजे शब्द विरहीत अभिनय, हावभाव, पवित्रा आणि मुद्रा अभिनय यातून अभिव्यक्त करावयाची कला आहे. एखादी कल्पना, विषय मांडणे अथवा गोष्ट सांगणे हे केवळ शारीरिक हालचालीतून त्यात व्यक्त केले जाते. मुकाभिनेत्याला सादरीकरणासाठी कोणत्याही वस्तूची किंवा स्टेज प्रॉपटींचा वापर करता येणार नाही.

1. एका महाविद्यालयाने फक्त एकच संघ पाठवावयाचा आहे.
2. मुकनाटय स्पर्धेत भाग घेणाऱ्या कलाकारांची संख्या किमान 3 आणि कमाल 6 अशी राहील.
3. साथीदारांची संख्या दोन पेक्षा जास्त असता कामा नये.
4. सादरीकरणासाठी प्रत्येक संघास किमान चार मिनिटांचा व कमाल पाच मिनिटांचा वेळ दिला जाईल. जास्तीत जास्त 30 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
5. स्पर्धेचा निकाल सर्वसाधारणपणे विषयाची निवड, सादरीकरणातील संकल्पना, रंगभुषा, पार्श्वसंगीत व प्रेक्षकांवर परिणाम इ. बाबींवर अवलंबून राहील.
6. संघ मुलांचा, मुलींचा किंवा मुलामुलींचा संमिश्र असू शकेल.

6. **पथनाटय** :

1. प्रत्येक महाविद्यालयाने जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी फक्त एकच संघ पाठवावयाचा आहे.
2. पथनाटय मराठी किंवा हिंदी भाषेत असावे.
3. स्पर्धेक विद्यार्थ्यांची संख्या जास्तीत जास्त 10 व कमीत कमी 6 असावी.
4. सादरीकरणासाठी किमान 12 मिनिटे व कमाल 15 मिनिटे वेळ दिला जाईल. जास्तीत जास्त 30 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिकचा वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
5. पथनाटीकेमध्ये राष्ट्रीय व्यक्तीवर वा तत्वावर टीका तसेच चारित्र्यहनन अशा बाबीचा समावेश असता कामा नये.
6. सादरीकरणासाठी विषय ज्या त्या महाविद्यालयाने निवडावयाचा आहे. राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय समस्या, राष्ट्रीय कल्याणकारी योजना, अंधश्रध्दा निर्मुलन व सामाजिक समस्या अशा विषयांना प्राधान्य द्यावे.
7. सादरीकरण पथनाटकाच्या पध्दतीने म्हणजे रंगभूषा, वेषभूषा, प्रकाश योजना व रेकॉर्डेड पार्श्वसंगीत यांना फाटा देवून व्हावे. मात्र पात्रांना वाद्य वापरण्यास परवानगी आहे. या स्पर्धेत साथीदाराची तरतूद नाही.
8. संघ मुलांचा मुलींचा अथवा मुलामुलींचा अथवा संमिश्र असू शकेल.

7. **भारतीय समूहगीत** :

1. एका महाविद्यालयाने फक्त एकच संघ पाठवावयाचा आहे.
2. समूहगीत हे भारतीय भाषेमध्ये असावे.
3. या स्पर्धेत तीन साथीदारांचा वापर करता येईल.
4. साथीदार वगळून संघात कमीत कमी 4 व जास्तीत जास्त 6 स्पर्धक असतील.
5. चित्रपटातील समुहगीतास परवानगी दिली जाणार नाही.
6. संघ मुलांचा, मुलींचा अथवा मुला–मुलींचा असू शकेल.
7. गायनाचे मुल्य लक्षात घेऊनच निर्णय दिला जाईल. तो वेशभूषा अथवा हावभाव यावर अवलंबून असणार नाही.
8. प्रत्येक संघाने दोन समूहगीते सादर करावयाची आहेत. त्यापैकी एक देशभक्तीपर गीत व एक भारतीय लोकगीत असलेच पाहीजे.
9. दोन समूहगीतांसाठी एकूण किमान 8 मिनिटे व कमाल 10 मिनिटे वेळ दिला जाईल. जास्तीत जास्त 30 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
10. साथीदारांनी गाणं म्हणू नये.

8. लोकसंगीत वाद्यवृंद :

1. एका महाविद्यालयाने फक्त एकच संघ पाठवावयाचा आहे.
2. लोकवाद्यवृंदामध्ये जास्तीत जास्त 9 व कमीत कमी 6 सहभागी कलाकार आणि 3 विद्यार्थी / व्यावसायिक साथीदार असतील.
3. संघामध्ये असणारे व्यावसायिक साथीदार हे सहभागी कलाकारांपेक्षा वेगळया वेशभूषेमध्ये असतील, ज्यायोगे व्यावसायिक साथीदार आणि सहभागी विद्यार्थी कलाकार सहज ओळखता येतील.
4. व्यावसायिक साथीदार हे स्वतंत्र बसतील आणि ते कोणत्याही प्रकारे मुख्य भूमिकेमध्ये नसतील.
5. संघ मुलांचा, मुलींचा अथवा मुला—मुलींचा असू शकेल.
6. वाद्ये लावणेसाठी प्रत्येक संघाला 10 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
7. सादरीकरणासाठी किमान 8 मिनिटे व कमाल 10 मिनिटे वेळ दिला जाईल. जास्तीत जास्त 30 सेकंद वेळ मान्य करता येईल. यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
8. लोकसंगीत वाद्यवृंद हा भारतातील कोणत्याही लोकसमूहाचे संगीत वाजवू शकतील जे कोणत्याही चित्रपटामधील असू नये.

9. वादविवाद :

1. स्पर्धेसाठी महाविद्यालयाचा विषयाचे बाजूने एक व विरूध्द बाजूने बोलणारा एक अशा दोन विद्यार्थ्यांचा एक संघ सहभागी होईल. ही सांघिक स्पर्धा समजली जाईल.
2. या स्पर्धेत मराठी, हिंदी अथवा इंग्रजी यापैकी कोणत्याही भाषेत बोलता येईल.
3. महाविद्यालयाने या स्पर्धेसाठी स्वतंत्र प्रवेशिका व प्रवेश शुल्क भरलेले असले पाहिजे.
4. प्रत्येक स्पर्धकास किमान 4 मिनिटांचा व कमाल 5 मिनिटांचा वेळ बोलण्यास दिला जाईल. एका स्पर्धकांस जास्तीत जास्त 15 सेकंद प्रत्येकी अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिकचा वेळ लागल्यास संघ स्पर्धेतून बाद केला जाईल.
5. विद्यापीठ युवा महोत्सव समितीने ठरविलेले / निवडलेले स्पर्धेचे विषय यजमान महाविद्यालयाच्या प्राचार्याकडून कळविण्यात येतील.
6. वादविवाद स्पर्धेमध्ये भाग घेणारे विद्यार्थी हे वक्तृत्व स्पर्धेमधीलच स्पर्धक विद्यार्थी असतील.
7. संघास स्पर्धेपूर्वी 5 मिनीटे अगोदर चिठ्ठी पध्दतीने विषय निवडता येईल. सदरचा विषय समितीने ठरविलेल्या / निवडलेल्या 5 विषयापैकीच एक असेल.

10. **प्रश्नमंजुषा :**

1. एका महाविद्यालयाने जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी फक्त एकच संघ पाठवावयाचा आहे. संघात किमान 2 व कमाल 3 स्पर्धकांचा समावेश असेल. यामध्ये किमान एक विद्यार्थीनी असणे आवश्यक.
2. जिल्हा पातळीवर स्पर्धक विद्यार्थ्यांची प्रथम सांघिक लेखी परीक्षा घेतली जाईल. प्रत्येक संघाला एक प्रश्नपत्रिका देण्यात येईल. परीक्षेचा कालावधी अर्धा तास असेल.
3. खालील विषयावर आधारीत लेखी परीक्षेची प्रश्नपत्रिका इंग्रजी माध्यमातून विद्यापीठात तयार केली जाईल.

   i) भारतीय इतिहास व भूगोल, ii) प्रचलित घडामोडी, iii) क्रीडा, iv) कला, साहित्य व विज्ञान, v) सामान्यज्ञान
4. जिल्हा पातळीवरील परीक्षा यजमान महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी आयोजित करावयाची असून उत्तरपत्रिका सिलबंद पाकीटातून संचालक, विद्यार्थी विकास यांचेकडे ताबडतोब पाठवावयाच्या आहेत. उत्तरपत्रिका विद्यापीठ पातळीवर तपासण्यात येतील. गुणानुक्रमे तिन्ही जिल्हयातून एकूण पहिल्या 6 क्रमांकात येणाऱ्या महाविद्यालयीन संघांना पत्राने किंवा फोनवरून कळविण्यात येईल.

5. वरील गुणवत्ता यादी गुणानुक्रमे क्र. 1 ते 6 स्थान मिळविणाऱ्या संघाना मध्यवर्ती युवा महोत्सवात भाग घेता येईल. हे सहा संघ तीन जिल्हयातून एकच निवडले जातील. <u>या सहा महाविद्यालयीन संघांची निवड जिल्हानिहाय असणार नाही.</u>
6. मध्यवर्ती युवा महोत्सवात भाग घेणाऱ्या 6 स्पर्धक संघांची परीक्षा तोंडी स्वरूपाची असेल व यावेळी दृक्श्राव्य (Audio Visual) साधनांचा सुध्दा वापर करण्यात येईल.

**टीप :– जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषा लेखी परीक्षा विद्यापीठाने निश्चित केलेल्या तारखेला तिन्ही केंद्रांवर (तीन जिल्हयांच्या यजमान महाविद्यालयामध्ये) एकाच वेळी आयोजित करण्यात येईल.**

**11. नकला :**

1. एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. प्रत्येक स्पर्धकाला किमान 4 मिनिटे व कमाल 5 मिनिटे वेळ दिला जाईल. जास्तीत जास्त 15 सेकंदाचा अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल.
3. स्पर्धकास विविध आवाजाची व प्रसिध्द व्यक्तीच्या भाषणाची नक्कल करता येईल. यामध्ये चित्रपट सृष्टीतील व्यक्तीमत्वांचाही समावेश राहील.
4. स्पर्धेचे मुल्यमापन नक्कल कौशल्य, आवाजाची विविधता, शब्दोच्चाराचे अनुकरण व सादरीकरण यावर राहील.

**12. सुगम गायन :**

1. प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकाला भाग घेता येईल.
2. प्रत्येक स्पर्धकाला जास्तीत जास्त दोन साथीदार (एक पेटीवादक व एक तबला वादक) बरोबर घेता येईल.
3. प्रत्येक गायकाला किमान 4 मिनिटांचा व कमाल 6 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
4. स्पर्धकास जास्तीत जास्त 15 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिकचा वेळ लागल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद केला जाईल.
5. या स्पर्धेत भावगीत, भक्तीगीत, भजन, गझल आणि अभंग सादर करता येईल.
6. स्पर्धेचा निर्णय गीताची निवड, स्वर, सादरीकरण, आणि एकूण परिणाम यावर अवलंबून राहील.
7. चित्रपटातील गीतास परवानगी असेल.
8. सुगम गायन कोणत्याही भारतीय भाषेत चालेल.

**13. वक्तृत्व :**

1. ही स्पर्धा मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषेत स्वतंत्रपणे आयोजित केली जाईल.
2. महाविद्यालयांना प्रत्येक भाषेतील स्पर्धेसाठी फक्त एकच स्पर्धक पाठविता येईल.
3. प्रत्येक स्पर्धकास किमान 4 मिनिटांचा व कमाल 5 मिनीटांचा वेळ बोलण्यास दिला जाईल. स्पर्धकास जास्तीत जास्त 15 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल त्यापेक्षा अधिकचा वेळ लागल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद केला जाईल.
4. प्रत्येक भाषेतील स्पर्धा स्वतंत्र असल्याने प्रत्येक भाषेसाठी स्वतंत्र प्रवेशिका पाठवावी.
5. स्पर्धेसाठी युवा महोत्सव समितीने ठरविलेले/निवडलेले 5 विषय स्पर्धेच्या आधी कळविले जातील.
6. स्पर्धकास स्पर्धेपूर्वी 5 मिनीटे अगोदर चिठ्ठी पध्दतीने विषय निवडता येईल. सदरचा विषय समितीने ठरविलेल्या/निवडलेल्या 5 विषयापैकीच एक असेल.

# मध्यवर्ती युवा महोत्सव नियमावली

विद्यार्थी विकास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर तर्फे यजमान महाविद्यालयांमध्ये संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील स्पर्धांमधून गुणानुक्रमे निवड झालेले संघ व स्पर्धक आणि काही स्पर्धांसाठी थेट प्रवेशासह मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजन युवा महोत्सव समितीने मान्य केलेल्या यजमान महाविद्यालयामध्ये केले जाते.

## मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी सूचना आणि नियमावली :

1. जिल्हास्तरीय स्पर्धेत गुणानुक्रमे तीन क्रमांक पटकावलेल्या संघांनी व स्पर्धकांनी मध्यवर्ती युवा महोत्सव स्थळी वेळेवर पोहोचावे. कोणत्याही परिस्थितीत स्पॉट रजिस्ट्रेशन केले जाणार नाही.
2. जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये एकांकीका, लघुनाटीका (विनोदी प्रहसिका) मुकनाटय पथनाटय, लोकनृत्य/लोककला, लोकसंगीत वाद्यवृंद, भारतीय समूहगीत व वादविवाद या सांघिक स्पर्धेत गुणानुक्रमे **पहिले तीन** क्रमांक मिळविलेल्या संघाना तसेच सुगम गायन, नकला व वक्तृत्व (मराठी, हिंदी, इंग्रजी) या वैयक्तिक स्पर्धेतील गुणाक्रमे **प्रत्येकी तीन** स्पर्धकांना आणि प्रश्नमंजुषा स्पर्धेमधील तिन्ही जिल्हयातून एकूण **पहिल्या सहा** संघांना मध्यवर्ती युवा महोत्सवात भाग घेता येईल. त्यामुळे या स्पर्धांसाठी पुनःश्च प्रवेशिका पाठविण्याची गरज नाही.
3. जिल्हास्तरीय सांघिक व वैयक्तिक स्पर्धांचे नियम मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या सांघिक व वैयक्तिक स्पर्धांना लागू करण्यात येतील.
4. मध्यवर्ती युवा महोत्सवात भाग घेणाऱ्या महाविद्यालयांनी थेट फक्त मध्यवर्ती युवा महोत्सवामध्येच नव्याने होणाऱ्या वैयक्तिक स्पर्धेसाठी प्रवेश अर्ज पाठवावयाचे आहेत.
5. थेट फक्त मध्यवर्ती युवा महोत्सवात होणाऱ्या वैयक्तिक स्पर्धेसाठी **किमान पाच** स्पर्धकांचे प्रवेश अर्ज येणे आवश्यक आहे. त्यापेक्षा कमी स्पर्धक आल्यास ही स्पर्धा घेतली जाणार नाही.
6. जिल्हास्तरीय युवा महोत्सव आयोजक यजमान महाविद्यालयांनी खालील स्पर्धांचे निकाल सर्व स्पर्धा संपल्यानंतर ताबडतोब जाहीर करून ते विद्यापीठाकडे पाठवावयाचे आहेत.

# मध्यवर्ती युवा महोत्सव स्पर्धा प्रकार

## I. जिल्हास्तरीय युवा महोत्सवातून मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये प्रवेश

### अ. सांघिक स्पर्धा –

1. निवडक लोकनृत्य (प्रत्येक जिल्हयातील 3 संघ)
2. निवडक लोककला (प्रत्येक जिल्हयातील 3 संघ)
3. निवडक एकांकिका (प्रत्येक जिल्हयातील 3 संघ)
4. निवडक लघुनाटिका (प्रत्येक जिल्हयातील 3 संघ)
5. निवडक मूकनाटय (प्रत्येक जिल्हयातील 3 संघ)
6. निवडक पथनाटय (प्रत्येक जिल्हयातील 3 संघ)
7. निवडक भारतीय समूहगीत (प्रत्येक जिल्हयातील 3 संघ)
8. निवडक लोकसंगीत वाद्यवृंद (प्रत्येक जिल्हयातील 3 संघ)
9. वाद विवाद (प्रत्येक जिल्यातील 3 संघ)
10. प्रश्नमंजूषा (तिन्ही जिल्हयातील गुणानुक्रमे एकूण 6 संघ)

ब. वैयक्तिक स्पर्धा –

1. नकला : प्रत्येक जिल्हयातील 3 स्पर्धक
2. सुगमगायन : प्रत्येक जिल्हयातील 3 स्पर्धक
3. वक्तृत्व : (मराठी) प्रत्येक जिल्हयातील 3 स्पर्धक
4. वक्तृत्व : (हिंदी) प्रत्येक जिल्हयातील 3 स्पर्धक
5. वक्तृत्व : (इंग्रजी) प्रत्येक जिल्हयातील 3 स्पर्धक

## II. मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये थेट प्रवेश

अ) सांघिक स्पर्धा

1. पाश्चिमात्य समूहगीत (Western Group Song)
2. सांघिक रचनाकृती (Instalation)

ब) वैयक्तिक स्पर्धा

1. शास्त्रीय नृत्य (Classical Dance)
2. एकपात्री अभिनय ( Mono Acting )
3. शास्त्रीय गायन (Classical Vocal)
4. पाश्चिमात्य एकलगायन (Western Solo)
5. शास्त्रीय सुरवाद्य (Classical Instumental Solo-Non Percussion) हिंदूस्थानी
6. शास्त्रीय तालवाद्य (Classical Instumental Solo-Percussion) हिंदूस्थानी
7. पाश्चिमात्य एकल वाद्यवादन ( Western Instrumental)
8. स्थळ चित्र (On the Spot Painting)
9. व्यंगचित्र (Cartooning)
10. भित्तीचित्र निर्मिती (Poster Making)
11. कातरकाम (Collage)
12. स्थळ छाया चित्रण ( Spot Photography )
13. मातीकाम मातीपासून प्रतिकृत्ती निर्मिती ( Clay Modelling )
14. रांगोळी (Rangoli )
15. मेहेंदी रचना

## मध्यवर्ती युवा महोत्सव स्पर्धेची नियमावली

अ) सांघिक स्पर्धा

1. लोकनृत्य

प्रत्येक जिल्हयामधून गुणानुक्रमे पहिले तीन क्रमांक मिळविलेले संघ भाग घेतील. स्पर्धेचे इतर नियम जिल्हास्तरीय स्पर्धेप्रमाणे असतील

2. लोककला

प्रत्येक जिल्हयामधून गुणानुक्रमे पहिले तीन क्रमांक मिळविलेले संघ भाग घेतील. स्पर्धेचे इतर नियम जिल्हास्तरीय स्पर्धेप्रमाणे असतील.

3. एकांकिका

प्रत्येक जिल्हयामधून गुणानुक्रमे पहिले तीन क्रमांक मिळविलेले संघ भाग घेतील. स्पर्धेचे इतर नियम जिल्हास्तरीय स्पर्धेप्रमाणे असतील.

4. लघुनाटीका–प्रहसिका

